माहिती व तंत्रज्ञान विभाग
दिनांक०८/१२/२०२२

**विषय** - ई-फाईल नोंद (File Tracking) प्रणालीबाबत. . . .

# परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत ई-फाईल नोंद (File Tracking) प्रणाली विकसित करणेत आलेली आहे. सदर प्रणाली द्वारे नस्तीची नोंद करणेत येऊन सदर नस्ती मा. आयुक्त कार्यालय, अतिरिक्त आयुक्त कार्यालय तसेच इतर विभागांकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करणेत येतात. सदर नस्तीची प्रणालीमध्ये नोंद केलेनंतर प्रणाली द्वारे Bar Code तयार होतो.

दि. १६.११.२०२२ रोजी मा. आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील कामकाजाबाबत झालेल्या आढावा बैठकीमध्ये मा. आयुक्त सो. यांनी मा. आयुक्त कार्यालयामध्ये येणा-या बहुतांश नस्तीं Bar Code सह प्राप्त होत नसलेबाबतची बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. तसेच मा. आयुक्त कार्यालयाकडे सादर होणा-या सर्व नस्ती Bar Code सह सादर होणेबाबत आदेश दिलेले आहेत.

यास्तव या परिपत्रकान्वये सर्व विभाग प्रमुखांना सुचित करणेत येते की, सदरचे परिपत्रक प्राप्त झालेपासून आपले विभागामार्फत मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त इतर विभागांकडे सादर होणा-या सर्व नस्तीं ह्या Bar Code सह सादर केल्या जातील याबाबतची दक्षता घेणेत यावी.

(जितेंद्र वाघ)
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८

क्र. मातवि/४ /कावि/३१५ /२०२२

प्रति - सर्व संबंधित विभाग प्रमुख